" आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांची जंयती उत्साहात साजरी"

दि.15 नोव्हेंबर -2019

लातूर - दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने आज शुक्रवार दि.15.11.2019 रोजी आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांच्या जयंती साजरी करण्यात आली. आदिवासी जननायक यांच्या जिवनावर प्रा.जिगाजी बुद्रुके यांनी सामाजिक जडणघडणेतील त्यांचे योगदान व्यक्त केले. बिरसा मुंडा यांनी त्यांच्या बालपणापासून ब्रिटीश जुलमी सत्तेला व धर्म परीवर्तनाच्या चळवळीला प्रखर विरोध केला. आदिवासी जमातीतील लोकांचे एकत्रिकरण करूण सशस्त्र संघर्ष व जुलमी राजवटीला प्रखर विरोध केला त्यांनी वयाच्या विसाव्या वर्षी छोटा नागपूर क्षेत्रात इ.स.1895 साली ब्रिटीश सत्तेच्या विरोधात प्रखर लढा प्रारंभ केला. त्यात त्यांना इंग्रज सत्तेकडून तुरूंगात डामण्यात आले व त्यातच वयाच्या पंचवीसाव्या वर्षी मृत्यु झाला. परंतु त्यांनी केलेल्या नेतृत्वामुळे भविष्यात अनेक क्रांती विरांना प्रेरणा देण्याचे कार्य त्यांनी करूण दाखविले. त्यांनी दिलेल्या आदिवासींच्या लढयाला आजही अनन्यसाधारण महत्व आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एस.पी.गायकवाड, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिल माळी, पर्यवेक्षक डॉ.दिलीप नागरगोजे, कार्यालय अधिक्षक नवनाथ भालेराव, वरीष्ठ लिपीक रमेश देशमुख, तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

15 Nov